महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३
Head Office: "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎ ०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९

प्रिन्सिपल कार्यालय : एमआयडीसी, ४ था मजला, एक्सप्रेस टॉवर, रामनाथ गोयंका मार्ग, एअर इंडिया इमारतीजवळ, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
Principle Office: MIDC Office, 4th Floor, Express Tower, Ramnath Goenka Marg, Near Air India Building, Nariman Point, Mumbai-400 021. ☎: +91-022-46677172/45758643

www.midcindia.org


क्र. मऔविम/भू-विभाग/मव्य (भूमी)/P२८४९७० दिनांक : 02/०४/२०२६

# परिपत्रक

**विषय: देकारपत्र व वाटपपत्रातील अटी व शर्तीमध्ये सुधारणा करणेबाबत.**
**"जसे आहे तसे व जेथे आहे तेथे" (As is where is basis) या अटीबाबत.**

**संदर्भ :** देकारपत्र व वाटपपत्राचा नमुना

एमआयडीसीद्वारे "जसे आहे तसे व जेथे आहे तेथे" (As is where is basis) या तत्त्वावर जमीन वाटप करण्याचा कायदेशीर आधार केवळ एक प्रशासकीय धोरण नाही; तर ते महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम ३९(१) द्वारे कायदेशीररित्या तपासलेले संरक्षण आहे. "जसे आहे तसे व जेथे आहे तेथे" अट समाविष्ट करण्यामागील कायदेशीर कारणे खालीलप्रमाणे आहेत:

१. एखादा अर्जदार "जसे आहे तसे व जेथे आहे तेथे" या तत्त्वावर जागेच्या लिलावात किंवा वाटपात सहभागी झाला की, त्याने त्या जागेची पाहणी केली आहे आणि तिची सद्यस्थिती स्वीकारली आहे, असे मानले जाते.
२. भूखंडाची नैसर्गिक स्थिती (उदा. चढ-उतार , खडक , झाडे किंवा भूखंडावर मोठ्या प्रमाणात भराव घालण्याची आवश्यकता), अतिक्रमण आणि वाद इत्यादी कारणास्तव वाटपास आव्हान देऊ नये या दृष्टीने सदर अट समाविष्ट करण्यात आली आहे.

'इज ऑफ डुइंग बिझनेस' अंतर्गत उद्योजकाला "रेडी-टू-यूझ" ( वापरण्यास तयार) भूखंड आवश्यक आहे. सदर अटीमध्ये महामंडळाद्वारे उपलब्ध करून द्यावयाच्या पायाभूत सुविधांचा (जसे औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, रस्त्यावरील दिवाबत्ती इत्यादी सामायिक सुविधा) समावेश होत नाही. 'इज ऑफ डुइंग बिझनेस' अंतर्गत महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील आरेखित भूखंड वाटपासाठी महामंडळाने MILAAP धोरण अवलंबिलेले आहे. त्याअनुषंगाने उद्योजकांना गुंतवणूक करणेकरीता प्रोत्साहित करणेसाठी देकार पत्र आणि वाटपपत्रामध्ये "जसे आहे तसे व जेथे आहे तेथे" (As is where is basis) ची अट ही केवळ वाटप भूखंडाच्या क्षेत्रासाठी लागू असल्यामुळे सदर अट पुढील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

*"The allotment of plot of land is on "As Is Where Is" basis. The condition "As Is Where Is" shall be applicable only to the physical state and topography of the specifically allotted plot area. It does not cover the common amenities and infrastructure like approach roads, water supply, street lighting, and drainage systems and other common infrastructure."*

उपरोक्त सुधारणे व्यतिरीक्त देकारपत्र व वाटपपत्रामध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही.

(पी. वेलरासु, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई-९३

प्रत:

(१) सह मुख्य कार्यकारी अधिकारी-१/२/३, मऔविम, मुंबई.
(२) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(३) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(४) महाव्यवस्थापक (मा व तं), संगणक प्रणाली अद्ययावत करणे करीता.
(५) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(६) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(७) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(८) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(९) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(१०) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(११) सर्व औद्योगिक संघटना
(१२) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, अंधरी (पू)/ एक्सप्रेस टॉवर, मुंबई.